# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
# (म्हाडाचा घटक)

**एम.एम.आर.डी.ए. कडून प्राप्त २५२१ सदनिकांच्या सोडतीकरिता प्रसिध्द केलेल्या प्रारुप यादीमध्ये आढळून आलेल्या गिरणी कामगार/ वारसांच्या दुबार अर्जापैकी कोणता अर्ज ग्राह्य धरावा याकरिता विहित मुदतीत विनंती अर्ज सादर करण्याकरिता**

**जाहीर सूचना**

१. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार बृहन्मुंबईतील ५८ बंद/ आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांकडून गिरणीच्या जमिनीवर उपलब्ध होणाऱ्या सदनिकांच्या सोडतीकरिता सन २०११, सन २०१२ व तसेच २०१७ मध्ये गिरणी कामगार/ वारसांकडून अर्ज संकलित करण्यात आले होते.

२. एकापेक्षा जास्त अर्ज केले असल्याचे आढळून आलेल्या एकूण १२९८१ गिरणी कामगार/वारस यांची यादी गिरणी कामगार/वारस यांची यादी म्हाडाचे संकेत स्थळ https://mhada.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली असून सदर **दिनांक १९/१२/२०२२ ते दिनांक १७/०१/२०२३** या कालावधीमध्ये उपमुख्य अधिकारी (धापुप्र/गिरणी)/ मुं.मं. कक्ष क्र.२०५, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१ या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून लेखी पुरावा, सद्याच्या पासपोर्ट साईजचा फोटो व ओळखत्रासह गिरणी कामगार/वारसांनी दुबार अर्जापैकी कोणता अर्ज ग्राह्य धरावा याबाबत लेखी निवेदन सबळ पुराव्यासह सादर करावे.

३. सदर मुदतीत दुबार अर्जापैकी कोणताही एक अर्ज ग्राह्य धरण्याबाबत लेखी निवेदन प्राप्त न झालेल्या दुबार अर्जापैकी एक अर्ज रद्द करण्याचे अधिकार मुंबई मंडळ /म्हाडाकडे राहतील.

४. तसेच ज्या गिरणी कामगारांचे गिरणी संकेतांक ५९ असा आहे अशा एकूण १५९५ अर्जदारांची यादी म्हाडाचे संकेत स्थळ https://mhada.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच ज्यांचे गिरणी संकेत क्रमांक चुकीचे आहेत, नावामध्ये दुरुस्ती करावयाची आहे अशा अर्जदारांकडून सबळ पुराव्यासह लेखी निवेदन व पुराव्याच्या आधारे वरील मुदतीत उपमुख्य अधिकारी (धापुप्र/गिरणी)/ मुं.मं. कक्ष क्र.२०५, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०००५१ या कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधून लेखी पुरावा, सद्याच्या पासपोर्ट साईजचा फोटो व ओळखत्रासह गिरणी संकेत बदलाबाबत लेखी निवेदन वरील मुदतीत सादर करावे.

स्वा/-
(मिलिंद बोरीकर)
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई